PARLE MAHOTSAV
www.parlemahotsav.com

# 19th PARLE MAHOTSAV
## CM चषक

Organised by : Vile Parle Cultural Centre
In Association with PTVA'S Sathaye College

www.cmchashak.com

2, Amber Palace, Chittaranjan Road, Vile Parle (E), Mumbai - 400 057. Contact : 2617 7125 / 2613 6513

दिनांक २६ डिसेंबर २०१८

**कृपया प्रसिद्धीसाठी**

**पार्ले महोत्सवातील सहभागींची शासनाचे क्रीडा व सांस्कृतिक मित्र म्हणून नेमणूक होणार**

# खेळून मार्कही वाढवा आणि पोटही भरा : विनोद तावडे

खेळून काही मार्क वाढणार नाही किंवा पोट भरणार नाही, ही मानसिकता बदलून टाकण्यासाठी खेळणा-या विद्यार्थ्यांना मार्क वाढविण्याचा आणि राज्य व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत भाग घेणा-यांना नोकरीत पाच टक्के आरक्षण देण्याचा निर्णय आपल्या क्रीडा विभागाने घेतला आहे, म्हणून भरपूर खेळा आणि खूप आनंद लुटा, असा सल्ला देत महाराष्ट्राचे क्रीडा व सांस्कृतिक मंत्री विनोद तावडे यांनी पार्ले महोत्सवात सहभागी झालेल्यांना क्रीडा मित्र व सांस्कृतिक मित्र म्हणून नेमण्यात येईल, अशीही ग्वाही दिली.

या महोत्सवाची 19 वर्षांपूर्वी संकल्पना मनात आल्यानंतर पराग अळवणी यांच्याशी चर्चा करताना त्याला आपणच पार्ले महोत्सव हे नाव सुचविले, हे मी माझे भाग्य समजतो, कारण पार्ले महोत्सव सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्रातला वैशिष्ट्यंपूर्ण नि आगळावेगळा असा महाराष्ट्रातला एकमेव महोत्सव असावा, यंदा त्याला सीएम चषकाची देखीलजोड आहे, त्यामुळे सहभागी होणा-यांसाठी अभिमास्पद आहे, असेही त्यांनी सांगितले.

श्री. तावडे यांनी 19 पार्ले महोत्सव-सीएम चषक स्पर्धांना भेट दिली तसेच खेळाडूंची आणि सहभागी झालेल्यांशी संवाद साधला. कबड्डी, व्हॉली बॉल, खो-खो या दुभाषी मैदानावरील खेळांचा काही वेळ आनंददेखील घेतला. यावेळी त्यांच्यासमवेत महोत्सवाचे आयोजक भाजपा आमदार ॲड. पराग अळवणी हेदेखील होते. त्यांनी या स्पर्धांना राजाश्रय मिळत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले तसेच या महोत्सवातून नव्या पिढीतील उद्याचे नामवंत कलाकार तसेच खेळाडू निर्माण होऊन राज्य व राष्ट्रीय पातळीवर आपला लौकिक प्राप्त करतील, असा विश्वास देखील व्यक्त केला.